**विशेष दिवाणी मुकदमा क्र.४६४/२०२३**
**निशाणी क्र. ८९**

**वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की --

माझे नांव - सौरभ शिवाजी लटके

वय सुमारे - २६ वर्षे, व्यवसाय- नोकरी,
नेमणुक – एच.डी.एफ.सी. बँक, ईस्ट स्ट्रीट, कॅम्प, पुणे.

---------------------

**<u>वादीतर्फे सरतपास ॲड. श्री. आर. के. तोडकर यांचेतर्फे सुरू</u> :**

१. मला न्यायालयामार्फत समन्स मिळालेले आहे. मला आता कागदयादी नि.क्रं.८८ लगत अ.नं.1 वरील अधिकारपत्र दाखविणेत आले. सदरचे अधिकारपत्र मला शाखा व्यवस्थापक, एच.डी.एफ.सी. बँक, ईस्ट स्ट्रीट शाखा, कॅम्प, पुणे यांनी दिलेले आहे. त्यावर शाखा व्यवस्थापक यांची सही व बँकेचा शिक्का आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास <u>नि.क्रं.९०</u> देणेत येते. मी आजरोजी योगेश एस. सारस्वते यांचा खाते उतारा दाखल केलेला आहे. मला आता कागदयादी नि.क्रं.८८ लगत अ.नं.२ वरील खाते उतारा दाखविणेत आला. सदरचे खाते बचत खाते असुन ते दि.०६.०४.२००५ रोजी उघडलेले आहे. सदरचे खाते सदयस्थितीत डॉरमंट आहे. सदरचा खाते उतारा हा दि.०१.०१.२०१२ ते ३१.१२.२०१२ या कालावधीतील आहे. त्या दरम्यान सदरचे खाते चालु होते. सदर खाते उताऱ्यावर शाखा प्रबंधक यांची सही व शिक्का आहे. सदर खाते उतारा आमच्या संगणकीय प्रणालीतुन काढण्यात आलेला आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्रं.९१</u>** देणेत येते. मला नि.क्रं.६९ वरील धनादेश दाखविणेत आला. तो धनादेश आमच्या बँकेत वटण्याकरीता दाखल केला होता. त्यावर धनादेश दाखल केल्यानंतर क्लीअरींगसाठी पाठवत असतानाचा शिक्का आहे. सदर धनादेश न वटल्यामुळे परत आला आहे. सदर खाते उताऱ्यामध्ये दि.२८.०३.२०१२ रोजी रक्कम ₹.८,००,०००/- चा धनादेश क्रं.१०५१९ हा वटल्याची नोंद आहे. तशी नोंद नि.क्रं.६९ वरील धनादेशाची दिसुन येत नाही.

**<u>उलटतपास प्रतिवादींतर्फे ॲड. श्री. आर. व्ही. कारंडे</u>**

२. मी बँकेत दोन वर्षापासुन नोकरी करतो. हे म्हणणे खरे आहे की नोंदी झाल्या त्यावेळी मी बँकेत नोकरीस नव्हतो. हे मला सांगता येणार नाही की नि.६९ वरील धनादेश किती तारखेला आमच्या बँकेत जमा करण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की सदरचा चेक किती तारखेला क्लीअरन्ससाठी दिला हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की बँकेत चेक व्हाऊचरसोबत भरला जातो. हे म्हणणे खरे आहे की सदर व्हाऊचरवर तारीख, चेकचा क्रमांक, रक्कम, भरणाऱ्याचे नाव व सही असते. हे म्हणणे खरे आहे की व्हाऊचरची स्लीप दोन भागात असते. हे म्हणणे खरे आहे की व्हाऊचरची एक छोटी बाजु चेक जमा करणाऱ्यास पोहोच म्हणुन परत केली जाते. हे म्हणणे खरे आहे की चेक क्लीअरन्ससाठी आल्यास त्याची खाते उताऱ्यामध्ये नोंद होते. हे म्हणणे खरे आहे की चेक क्लीअर न झाल्यास ज्या खात्यावर चेक जमा केला आहे त्या खातेधारकास दंड लागतो. हे म्हणणे खरे आहे की धनादेश न वटता परत आल्यानंतर त्याची नोंद खातेउताऱ्यात होते. हे म्हणणे खरे आहे की धनादेश न वटता परत आल्यास आम्ही त्याच्या कारणाचा मेमो देतो. हे म्हणणे खरे आहे की तसा मेमो या कामात दाखल नाही. हे म्हणणे खरे आहे की चेक न वटल्यास जो दंड आकारला जातो त्याची नोंद नि.क्रं.९१ वरील खाते उताऱ्यात नाही. हे मला सांगता येणार नाही की नि.क्रं.६९ वरील चेक वटला नाही याची समज आम्ही वादीला दिली आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की सदर चेक आमच्या बँकेत आला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की सदर चेकच्या पाठीमागील बाजुस कोणाची सही आहे हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की त्यावर बँक मॅनेजर अथवा इतर कुठल्याही अधिकाऱ्याचे नाव नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की त्यावर सही शिक्क्याची तारीख आणि वार नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्थळ : वाई
दिनांक : ०६.०३.२०२६

(ए. ए. पाचरणे)
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
वाई.